कायम विनाअनुदानित

शिक्षण विभाग प्राथमिक पुणे महानगरपालिका
भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना
शिवाजीनगर पुणे 411 005
जावक क्र / खाप्राशा 9892
दिनांक 20/6/18

प्रति,
मुख्याध्यापक,
ज्ञानप्रबोधिनी इंग्लिश मिडियम स्कूल
ससाणेनगर, हडपसर, पुणे 28

विषय – कायम विनाअनुदान तत्वावरील षासन मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांच्या नैसर्गीस वाढीच्या वर्गांना परवानगी देणेबाबत.

संदर्भ –1. शासन निर्णय क्रमांक व्ही एल एस 1002/1000/02 प्राशि 3 दिनांक 23/09/2003
2 मा शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचा दिनांक 3 नोव्हेंबर 2010 चा आदेश

उपरोक्त विषयास अनुसरून ज्ञानप्रबोधिनी इंग्लिश मिडियम स्कूल ससाणेनगर, हडपसर, पुणे या शाळेचा तुकडया नैसर्गीक वाढीचा प्रस्ताव इकडील कार्यालयास प्राप्त झालेला होता. सहा प्रशासकीय अधिकारी यांचे शिफारशीनूसार खालील तक्त्यात दर्शविल्यानूसार उपरोक्त शाळेस, अटी शर्तीस अधिन राहून नैसर्गीक वाढीचे वर्ग मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | नैसर्गीक वाढ सन |
|---|---|---|---|---|
| 1. | ज्ञानप्रबोधिनी इंग्लिश मिडियम स्कूल ससाणेनगर, हडपसर, पुणे 28 | इंग्रजी | इयत्ता 2 री ते इयत्ता 7 वी नैसर्गीक वाढीने | नैसर्गीक वाढ इयत्ता 2 री जून 2011<br>नैसर्गीक वाढ इयत्ता 3 री जून 2012<br>नैसर्गीक वाढ इयत्ता 4 थी जून 2013<br>नैसर्गीक वाढ इयत्ता 5 वी जून 2014<br>नैसर्गीक वाढ इयत्ता 6 वी जून 2015<br>नैसर्गीक वाढ इयत्ता 7 वी जून 2016 |

अटी व शर्ती ––

1. शाळेस शासनाने वेळोवेळी मंजूर केल्यानूसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तीच्या अधीन राहून नेमला पाहीजे.
2. सदर शाळेने तुकडयांसाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील
3. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी
4. शाळेने शासनाकडून वेळोवेळी विहीत केलेला अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे
5. मंजूर करण्यात आलेल्या तुकडयांमूळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घ्यावी
6. सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थी संख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
7. तपासणीअंती अटी शर्तीचा भंग केल्याचे निदर्शनास आल्यास तुकडी/वर्गमान्यता त्वरीत रद्द करण्यात येईल
8. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटींवर सदर मान्यता देण्यात येत आहे
9. आ.टी.ई. ॲक्ट 2009 चे तंतोतंत पालन करणे बंधनकारक राहील

19-6-18

प्रशासकीय अधिकारी,
शिक्षण विभाग प्राथ. पुणे मनपा

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
यशवंतराव चव्हाण भवन, वेलस्ली रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१.
शिक्षण विभाग (प्राथमिक)
Email- edupri.zppune@gmail.com | ssapune1@yahoo.co.in

# प्रथम मान्यता

जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा1/413/2६८४ /2024 पुणे 1 दिनांक: /04/2024 03/05/2024

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,
महात्मा फुले विद्यानिकेतन संस्था, ससाणेनगर, हडपसर, पुणे संचालित
ज्ञानप्रबोधिनी इंग्लिश मेडीयम स्कुल, ( 27251700326 ) ससाणेनगर, हडपसर, पुणे 28

विषय - सन 2022-23 या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा(स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत..

संदर्भ - 1.शासन निर्णय क्र. प्राशाव-2019/प्र.क्र.132/एसएम-5, दिनांक 17/09/2019 शालेय शिक्षण मंत्रालय, मुंबई
2.जा.क्र.शिउसं/प्राथ-202/पुवि/2019-20/6622, शिक्षण उपसंचालक पुणे विभाग दिनांक 10/12/2019
3.मुख्याध्यापक यांचेकडील प्रस्ताव दिनांक 13/02/2024
4.श्रीम. मोमीन अस्मा बेगम मोहम्मद इमादोद्दीन, उपशिक्षणाधिकारी, जि.प.पुणे यांचेकडील तपासणी अहवाल 22/04/2024

उपरोक्त संदर्भीय विषयांन्वये कळवण्यात येते की, आपल्या संस्थेने प्रथम मान्यता करीता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार व तपासणी अधिकारी यांनी केलेली शिफारशी नुसारआपल्या संस्थेस संदर्भ क्र .1 ते 4 नुसार खालील अटी व शर्तीवर इयत्ता 8 वी साठी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | सुरु वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | महात्मा फुले विद्यानिकेतन संस्था, ससाणेनगर, हडपसर, पुणे | ज्ञानप्रबोधिनी इंग्लिश मेडीयम स्कुल, ( 27251700326 ) ससाणेनगर, हडपसर, पुणे 28 | इंग्रजी | नवीन शाळा स्वयंअर्थसहाय्यित | इयत्ता 8 वी | 2019-20 |

## अटी व शर्ती

1. मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण इ.मध्ये भविष्यात शासनच्या परवानगीशिवाय कोणताही बदल करता येणार नाही.
2. शाळा व्यवस्थापनाने शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर त्या शाळेची परवानगी रद्द होईल.
3. स्वयंअर्थ सहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमानुसार व विनियमानुसार करण्यात यावी.
4. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
5. परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थ सहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
6. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयं अर्थ सहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा , मंडळ सलग्नता क्रमांक, UDISE कोड इ. तपशील दर्शविणारा फलक लावणे बंधन कारक राहील.
7. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
8. शासन मान्यता पत्र क्र. प्राशाव-2019/प्र.क्र.132/एसएम-5, दिनांक 17/09/2019 मधील सर्व अटी व शर्ती पुर्ततेच्या अधिन राहुन मान्यता देणेत येत आहे.
9. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 याअधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
10. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.
11. **भविष्यात या शाळेची प्रथम मान्यता बाबत कोणत्याही स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्यास अथवा न्याय प्रविष्ठ प्रकरण उद्भवल्यास सदरचा प्रथम मान्यता आदेश रद्द करण्यांत येईल.**

( संजय नाईकडे )
शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद,पुणे

23250/66

**कायम विनाअनुदान तत्वावर**
**(माध्यम इंग्रजी)**

**जाक्रप्रा.प्राशि-३/खाप्राशा/मा.इंग्रजी/१०-११**
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.**
**दिनांक :** - 3 NOV 2010

**प्रति**

**१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),**
**जिल्हा परिषद,**

**२. शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी**
**महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,पुणे.**

**विषय: सन २००९-२०१० या शैक्षणिक वर्षात परवानगी मिळालेल्या नविन खाजगी प्राथमिक शाळेस सन २०१०-२०११ या शैक्षणिक वर्षापासून नुतनीकरणाने परवानगी देणेबाबत. . .**

**संदर्भ: १. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्रमांक नप्राशा-१००८/ प्र.क्र.६७९ प्राशि-३, दिनांक २० ऑगष्ट २००९**
**२. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्र. नमाशा-२००७/(९८६/०७) दिनांक १९ ऑक्टोबर २००७**
**३. या कार्यालयाचे पत्र क्र.शिऊसं/प्राशि ३/नखाप्राशा/पुवि/०९ २९४९१-९५ दिनांक २/१२/२००९.**
**४. आपले पत्र क्र. खाप्राशा/४१३८/१०-११. दिनांक ५/१०/२०१०**

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भ क्र.३ चे पत्र कृपया पहावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमासाठी सन २००९-१० या शैक्षणिक वर्षामध्ये शाळेस परवानगी देण्यात आलेली आहे. तथापी संबधीत संस्थेने सदर शैक्षणिक वर्षात शाळा सुरु न करता सदरची शाळा सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षामध्ये सुरु केलेली असून सदर शाळेस नूतनीकरणाने परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.४ चे पत्रान्वये प्राप्त झालेला आहे. सदर प्राप्त प्रस्तावानूसार सदर संस्थेच्या शाळेस संदर्भ क्र. २ अन्वये नविन प्राथमिक शाळा सुरु करण्याच्या परवानगीचे नुतनीकरण करुन जून,२०१० पासून इ. १ ली च्या वर्गास शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर **कायम विनाअनुदान तत्वावर** परवानगी देण्यात येत आहे. इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्वावर भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६ |
| **१.** | **महात्मा फुले विद्यानिकेत संस्था,स.नं.३११/२,ससाणेनगर, हडपसर,पुणे २८** | **ज्ञानप्रबोधिनी इंग्लिश मिडीयम स्कूल,स.नं.३११/२, ससाणेनगर,हडपसर,पुणे २८.** | **१ ली** | **इंग्रजी** | **जून २०१० पासून** |

**सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास शाळा परवानगी आपोआप रद्द होईल.**

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणाकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पा[illegible]जे

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक [illegible] आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्ती [illegible] नेमला पाहिजे.

Scanned with CamScanner

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी करणे पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम ... यांचे सूयोग्यतेने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या ...

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तीशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रदद समजण्यांत येईल.

३.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबधीत संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नूतनीकरणासाठी अर्ज सक्षम अधिका-यांडे परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे बंधनकारक राहील.अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल.एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

३.१३ जनहितार्थ या.क्र.४८३/०४ मध्ये मा..सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४ एप्रिल, २००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१.शाळामध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२.शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.

३.शाळेचा संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यांत यावे.

४ सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building code of India अंतर्गत विहीत केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देणेपूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

५ प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी (National Building code of India) चे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

संदर्भ १. शासन पत्र क्रमांक याचिका २००९/प्र.क्र. २४४/प्राशि-४/ दिनांक १९ सप्टेंबर, २००९

२. संचालनालयाचे पत्र क्र. संकीर्ण /२००९/६४११६/याचिका/१५ क (८) ९३४४, दिनांक २४ सप्टेंबर,२००९

३ शासन निर्णय क्रमांक १९०९/प्र.क्र.४३१/प्राशि-३, दिनांक २०/१०/२००९

---

---

सदर परवानगी पत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने ही परवानगी संबंधित शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास तात्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी मिळालेल्या माध्यमातून व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. अशा संस्थेने तद्नंतर सक्षम प्राधिकाऱ्याकडे (आपणाकडे) नविन प्राथमिक शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा, असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने शाळेची तपासणी करुन तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा व शाळेच्या मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/शिक्षण समितीची मान्यता मिळताच त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

स्वाक्षरीत शि. उ. सं. यांची सही असे.

(कु. ...)
शिक्षण ...
पुणे विभा... करिता.

प्रत माहितीस्तव सविनय सादर.

१.मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

२.मा.शिक्षण संचालक, (प्राथमिक),प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

३.शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

४.अध्यक्ष/सचिव,
महात्मा फुले विद्यानिकेत संस्था,स.नं.३११/२,ससाणेनगर,हडपसर,पुणे २८

Scanned with CamScanner